वाचले :-

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०११ मधील सुधारित तरतूदी.

२) महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/ १६ब, दिनांक ०७ मे,२०२१.

३) पदोन्नती समिती सभा दि.३०/११/२०२२ चा सभावृत्तांत.

४) सामान्य प्रशासन विभागाकडील आदेश क्र. प्रशा/०२/कावि/४४७/२०१५,दि.२०/१०/२०१५

५) दि. १८/०४/२०२३ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८
माध्यमिक शिक्षण विभाग
जा.क्र. माध्य/१/कावि/ २०८ /२०२३
दि. ०२/०५/२०२३

विषय –"मुख्याध्यापक" या पदावर पदोन्नतीबाबत.

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवर "मुख्याध्यापक" या अभिनामाची पदे पे.लेवल S-१७ वेतनश्रेणी ४७६००-१५११०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे.त्यापैकी रिक्त पदे पदोन्नतीने भरणेकामी दि.३०/११/२०२२ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करणेत आली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व 'मुख्याध्यापक' पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता,अनुभव कालावधी,सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, संगणक अर्हता,मालमत्ता व दायित्व, आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादी सेवाविषयक तपशिल पडताळून,सहा.शिक्षक पदावरील कर्मचा-यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन तसेच दि.०७/०५/२०२१ रोजीचे शासन निर्णयास अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात जेष्ठतेनुसार "मुख्याध्यापक" पदावर पे.लेव्हल S-१७ वेतनश्रेणी ४७६०० - १५११०० या वेतनश्रेणीत पदोन्नती देणेस शिफारस केली आहे.सदर ६ पदांपैकी पाच पदांवर मुख्याध्यापकांची नेमणुक करणेत आलेली असुन दि.३०/०४/२०२३ रोजी खुल्या प्रवर्गातील एक मुख्याध्यापक पद सेवानिवृत्तीमुळे रिक्त होत असलेने व उपरोक्त वाचले क्र.०३ च्या सभावृत्तांत अन्वये पदोन्नती देण्यात आलेले खुल्या प्रवर्गातील पुढील पात्र सहाय्यक शिक्षकांस खाली नमुद केलेलेनुसार मुख्याध्यापक या पदोन्नतीचे पदावर सविस्तर नेमणुक देण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव | पदोन्नतीचा प्रवर्ग | सविस्तर नेमणुकीचे विद्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री.पंडित चंद्रशेखर हिरालाल | जेष्ठतेनुसार | माध्यमिक विद्यालय,वाकड |

सबब,उपरोक्त नमुद केलेल्या बाबी विचारात घेता मी अतिरिक्त आयुक्त (१),पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी १८. मला वाचले क्र. ०४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन प्रस्तुत आदेशान्वये उपरोक्त नमुद केलेल्या कर्मचा-यास मुख्याध्यापक या पदावर पे.लेव्हल S-१७ वेतनश्रेणी ४७६००-१५११०० या वेतनश्रेणीत आदेशाचे दिनांकापासुन खालील अटींचे अधिन राहुन पदोन्नतीने नेमणुक देण्यास मान्यता देत आहे. या संदर्भात पदोन्नतीचे लाभ पुर्वलक्षी प्रभावाने मागता येणार नाही.

अटी-

१) सदरची पदोन्नती ही प्रथमत: १ वर्ष परिविक्षाधिन कालावधीकरिता (Probation period) पुर्णत: हंगामी स्वरुपात राहील. परिविक्षाधिन कालावधीत कामकाज हजेरी, वर्तणुक असमाधानकारक वाटल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता पदोन्नतीपुर्व सहाय्यक शिक्षक या पदावर पदावनत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.एसएसएन-२६९८-११७९२-(१४०-९८) माशि-२, दि.१३ जुन २००५ नुसार एक वर्षाचा शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम वरील कर्मचा-यांनी पदोन्नती पासुन १ वर्ष कालावधीत पुर्ण करणे बंधन कारक राहील. सदर अभ्यासक्रम मुदतीत पुर्ण न केल्यास देण्यात आलेली पदोन्नती रद्य करण्यात येऊन वरीष्ठ पदाचे दिलेले वेतन वसुल करणेत येईल.

३) सदर पदोन्नती आपण सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे दिलेली असुन, त्यात तफावत आढळल्यास अथवा प्रकरण न्यायप्रविष्ठ झाल्यास सदरची पदोन्नती रद्य करण्यात येईल.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधिताचे सेवानोंद पुस्तकात घेणेत यावी.

सही/-
(प्रदीप जांभळे पाटील)
अतिरिक्त आयुक्त (१)
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८

प्रति,
श्री.पंडित चंद्रशेखर हिरालाल, सहाय्यक शिक्षक मा.वि.रूपीनगर

प्रत- १) लेखा विभाग
२) मुख्यलेखा परिक्षक
३) प्रशासन विभाग, कर्मचारी वैयक्तीक नोंदणी कक्ष, संगणक कक्ष(प्रशासन), मागासवर्गीय कक्ष,संगणक विभाग
४) माध्यमिक विभाग टेबल क्र. ४
५) माध्यमिक विद्यालय रूपीनगर / वाकड
२/- पुढील कार्यवाहीसाठी

(विजयकुमार थोरात)
सहाय्यक आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८